**प्रेसनोट दिनांक ०३/०८/२०२२**

**दरोडा विरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवडची कामगिरी**

# जुगाराच्या आड्ड्यावर छापा टाकुन, २६ आरोपींना अटक करून, त्यांचेकडुन किं.रू. ३५,१०,२७०/- रूचा मुद्देमाल हस्तगत.

मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत अवैध धंदयावर कारवाई करणेबाबत आदेश दिले होते. त्याअनुषंगाने दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रामदास इंगवले, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे व पोलीस अंमलदार असे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत गस्त करीत असताना वपोनि रामदास इंगवले यांना बातमी मिळाली की, येलवडी रोड, देहुगाव येथील एस एच ई पी एल, हेव्ही इंडस्ट्रीयल फॅब्रिकेशन लिमिटेड, कंपनीचे गेटच आत बिल्डींग मध्ये काही इसम जुगार खेळत आहेत अशी खात्रीशीर बातमी मिळाली. त्याबाबत वरिष्ठ अधिकारी यांना माहिती देवुन, दरोडा विरोधी पथकाकडील पोलीस स्टाफ व गुन्हे शाखा युनिट ५ कडील स्टाफ असे मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन, सापळा रचुन, रात्रौ ०२:०० वा छापा टाकला असता, आरोपी नामे शेखर गुलाब परंदवाड, वय – ५० वर्षे, धंदा- नोकरी रा.माळवाडी, देहुगाव. जि.पुणे व इतर २५ आरोपी यांना ताब्यात घेतले असता, सदरचे इसम हे तीन पत्ती नावाचा जुगार पैश्यावर खेळत असल्याचे निष्पन्न झाले. नमुद इसमांकडे एकुण ५,३३,६१०/- रू रोख रक्कम, एक हुंडाई कंपनीची क्रेटा कार, एक मारूती स्विफ्ट कार अशी ०२ चारचाकी वाहने, १८ दुचाकी वाहने, २७ मोबाईल फोन व इतर जुगाराचे साहित्य असा एकुण ३५,१०,२७०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द **महाळुंगे पोलीस ठाणे गुरनं १२३३/२०२२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम १८८७ चे कलम ४ व ५** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवडचे मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे, मा. अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), डॉ. काकासाहेब डोळे, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे डॉ. प्रशांत अमृतकर, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पद्माकर घनवट यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री रामदास इंगवले, पोलीस उप निरीक्षक श्री. मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार प्रविण कांबळे, आशिष बनकर, राजेश कौशल्ये, प्रविण माने, गणेश कोकणे, तसेच गुन्हे शाखा, युनिट ५ कडील धनराज किरनाळे, गणेश मालुसरे, संदिप ठाकरे, सावन राठोड, दत्तात्रय बनसोडे, नितीन बहिरट, शामसुंदर गुट्टे व दयानंद खेडकर यांचे पथकाने केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
**पोलीस उप आयुक्त (गुन्हे)**
**पिंपरी चिंचवड**